प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक

पुढारी

स्थापना १९३९

www.pudhari.com

सातारा बुधवार । ३ एप्रिल २०१९ । वर्ष ८१ । मुंबई, पुणे, औरंगाबाद, कोल्हापूर, सांगली, सातारा, ठाणे, रायगड, सिंधुदुर्ग, रत्ना

भोसले कॉलेज ग्रंथालय कोरेगाव

# डी. पी. भोसले महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन

**कोरेगाव : प्रतिनीधी**

येथील डी. पी. भोसले महाविद्यालयात रयत शिक्षण संस्था शताब्दी महोत्सवी वर्ष व महाविद्यालयाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त आंतराष्ट्रीय परिषद व राष्ट्रीय चर्चासत्रांचे आयोजन करण्यात आले आहे.

या परिषदेचे उद्घाटन महाराष्ट्र राज्य भटक्या-विमुक्त आयोगाच्या अध्यक्षा प्राचार्या डॉ.सुवर्णा रावळ यांच्या हस्ते होणार असल्याची माहिती आंतरराष्ट्रीय परिषदेचे चेअरमन प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत यांनी दिली.

मराठी, हिंदी व इंग्रजी विभागाच्यावतीने भटक्या-विमुक्तांची श्रम-संस्कृती: कला आणि साहित्य तर इतिहास, भूगोल व अर्थशास्त्र विभागाच्यावतीने मानवी जीवनासमोरील समस्या व आव्हाने या विषयावर आंतरविद्याशाखीय आंतरराष्ट्रीय परिषद दि. १ व २ एप्रिल रोजी संपन्न होत आहे. या परिषदेमध्ये रोमानिया, इटली, तिबेट, इंग्लंड, रशिया, युक्रेन व यमेन आदी देशातील तज्ज्ञ संशोधक मार्गदर्शन करणार आहेत.

वाणिज्य विभागाच्यावतीने वस्तूसेवाकराचा भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम, जीवशास्त्र विभागाच्यावतीने आधुनिककाळातील जीव-विज्ञानाची संकल्पना व रसायनशास्त्र विभागाच्यवतीने हरित रसायनशास्त्र व विषयज्ञान यांमधील नवीन क्षितिजे या विषयावर राष्ट्रीय चर्चासत्र संपन्न होणार आहे.